पुण्य नगरी

# कोरोना वॉरियर्सना गोळ्याचे वाटप

**पुणे** : पुणे शहराच्या नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, कोरोनावर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी पुणे महानगरपालिकेचा प्रत्येक कर्मचारी सैनिकासारखा लढतो आहे. या कोरोना वॉरियर्सना त्यांची रोगप्रतिकार क्षमता चांगली राहण्यासाठी श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटरतर्फे देण्यात येणारी रस माधव वटी उपायकारक ठरेल, असे मत महापौर मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले. परमपूज्य सद्गुरु श्री आनंदनाथ महाराज सांगवडेकर यांच्या आशीर्वादाने व राजवैद्य समीर जमदग्नि यांच्या मार्गदर्शनाने चालविण्यात येत असलेल्या 'चला... भारत सशक्त करू या' मोहिमेअंतर्गत श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर, कोल्हापूर आणि फाउंडेशनच्या वतीने पालिकेतील २० हजार कोरोना वॉरियर्सना रस माधव वटीच्या उपक्रमाचा शुभारंभ महापौर मोहोळ यांच्या हस्ते झाला. संयोजक वैद्य तुषार सौंदाणकर, वैद्य राहुल शेलार, क्विकहिल सीएसआर हेड अजय शिर्के, वैद्य श्रीकांत काकडे, वैद्य गिरीश शिर्के, वैद्य अभय जमदग्नी, वैद्य विनय सचदेव आदी उपस्थित होते.